# ॥ज्योतिर्मय॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २६४ वा ❑ बुधवार दि.१७ डिसेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

# रेल्वेमध्ये धूम्रपान करणे दंडनीय अपराध

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

ट्रेनमध्ये धूम्रपान करणे हा भारतीय रेल्वे कायद्याच्या कलम १६७ नुसार गुन्हा आहे आणि याबद्दल दंड आकारला जातो, जो १०० रुपयांपासून सुरू होतो. मात्र प्रवाशी रेल्वे मध्ये खुलेआम धूम्रपान करतात. रेल्वे प्रशासन प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि इतर प्रवाशांना त्रास होऊ नये म्हणून ट्रेनमध्ये आणि स्थानकांवर धूम्रपान करण्यास मनाई करते आणि नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाई केली जाते, ज्यामध्ये दंड किंवा इतर कायदेशीर कारवाईचा समावेश असू शकतो.

इलेक्ट्रॉनिक सिगारेट (वेप्स) वापरण्यासही मनाई आहे. रेल्वे प्रशासन या नियमांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि नियमांचे पालन करण्यासाठी मोहीम राबवते.तरी काही प्रवाशी इतरांची काळजी न करता धूम्रपान करतात.

धूम्रपान केल्याने ट्रेनमध्ये आग लागण्याची दाट शक्यता असते, कारण जळती सिगारेट किंवा बिडी कचरापेटीत टाकल्यास किंवा इतर ज्वलनशील वस्तूंजवळ पडल्यास आग भडकू शकते आणि यामुळे प्रवाशांच्या जीवाला मोठा धोका निर्माण होऊ शकतो, म्हणूनच रेल्वेने ट्रेनमध्ये धूम्रपान करण्यास मनाई केली आहे आणि यावर कठोर कारवाई केली जाते, ज्यात दंड आणि तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. ट्रेनमधील कचरापेट्यांमध्ये टाकलेल्या जळत्या सिगारेटमुळे आग लागण्याचा मोठा धोका असतो, कारण हवेच्या प्रवाहामुळे ती भडकू शकते.

काही प्रवाशी शौचालयात जाऊन धूम्रपान करतात. अनेक प्रवाशांना वाटते की शौचालयात धूम्रपान करता येते, पण हे पूर्णपणे चुकीचे आहे आणि तिथेही आग लागण्याचा धोका असतो.

माचीस किंवा इतर ज्वलनशील वस्तूंची निष्काळजीपणे फ ेकल्याने आग लागते.

मार्च २०२१ मध्ये शताब्दी एक्सप्रेस मध्ये धूम्रपान केल्याने एका डब्यात आग लागली होती.असे प्राथमिक चौकशीत आढळून आले.ही घटना उत्तराखंड मधील रायवाला जवळ १३ मार्च २०२१ मध्ये घडली होती.

अलीकडेच वंदे भारत ट्रेनमध्ये एका व्यक्तीने सिगारेट ओढल्याचे प्रकरण समोर आले होते. सिगारेट ओढण्यासाठी तो व्यक्ती ट्रेनच्या बाथरुममध्ये गेला, पण त्याला संपूर्ण ट्रेनमध्ये स्मोक सेन्सर्स बसवले आहेत याची कल्पना नव्हती. त्याने सिगारेट पेटवताच स्मोक सेन्सर्स सुरु झाले आणि अलर्ट अलार्म वाजू लागला. यानंतर संपूर्ण कोचमध्ये एरोसोल स्प्रे सुरू झाला. इतर प्रवाशांनी घाबरून आपत्कालीन फोनद्वारे गार्डला माहिती दिली. या प्रवाशाबाबत एक मजेशीर बाब म्हणजे वंदे भारत ट्रेनमधून तो विना तिकीट प्रवास करत होता.

देशाचा व समाजाचा एक जबाबदार नागरिक या नात्याने रेल्वे मध्येच नव्हे तर सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करू नये. ट्रेनमध्ये किंवा रेल्वे परिसरात कुठेही धूम्रपान करू नका. इतर प्रवाशांच्या सुरक्षिततेचा विचार करा आणि जबाबदार नागरिक म्हणून नियम पाळा.







# आष्टी येथील आदिवासी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदी डॉ. विनायक तुमराम

**ज्योतिर्मय साहित्य**

गडचिरोली : मराठी भाषा विभाग महाराष्ट्र शासन तथा महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या अनुदानातून वनवैभव शिक्षण मंडळ अहेरी संचलित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय आष्टी येथे होत असलेल्या पहिल्या गडचिरोली जिल्हा आदिवासी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त विचारवंत, आदिवासी साहित्याचे प्रवर्तक प्रा.डॉ. विनायक तुमराम यांची निवड करण्यात आली आहे. दिनांक २३ व २४ डिसेंबरला आष्टी येथे होत असलेल्या आदिवासी साहित्य संमेलनाचे उद्घाटन



पद्मश्री डॉक्टर परशुराम खुणे यांच्या शुभहस्ते करण्यात येणार असून ज्येष्ठ समीक्षक डॉ.प्रमोद मुनघाटे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. आ. डॉ.मिलिंद नरोटे, माजी मंत्री तथा आ. धर्मरावबाबा आत्राम, आ. रामदास मसराम, माजी मंत्री राजे अंबरीशमहाराज आत्राम, माजी आमदार डॉ. नामदेव उसेंडी, प्राचार्य बनपूरकर, प्राचार्य डॉ. एस. एम. वारकड, साहित्यिक सुनील कुमरे, ज्येष्ठ साहित्यिक कुसुम अलाम यांच्यासह अनेक साहित्यिकांची मांदियाळी संमेलनात मार्गदर्शन करणार आहे. सदर संमेलनात आदिवासी साहित्याची वाटचाल, साहित्य निर्मिती आणि प्रकाशन व्यवहार, आदिवासी साहित्य : समाज आणि संस्कृती, गडचिरोली जिल्ह्याचे आदिवासी साहित्य, आदिवासी जीवन वास्तव आणि नाटक, या विषयावरील परिसंवाद, वाचायचे का? कसे? कशासाठी ? या विषयावरील चर्चासत्र, कवी संमेलन आणि युवकाकरिता कवी संमेलन अशा विविध वैचारिक व बौद्धिक कार्यक्रमाबरोबरच आदिवासी कलाविष्कारांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे हे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील साहित्यप्रेमींनी सदर साहित्य संमेलनात उपस्थित राहण्याचे आवाहन स्वागताध्यक्ष वनवैभव शिक्षण मंडळाचे सचिव मा. अब्दुल जमीर उर्फ बबलूभैय्या हकीम, निमंत्रक प्राचार्य डॉ. संजय फुलझेले व संयोजक प्रा.राजकुमार मुसणे यांनी केले आहे.

# कडूसं पडताना...! (सांज प्रहर)

**ज्योतिर्मय साहित्य**

....आणि सर्रकन उडालेली धूळ वाटा वाटानी पांगली. गरगर फिरणारी गाडीची चाके वाऱ्याच्या वेगाने पुढे जात होती. अन् बाजूने मागे मागे जाणारी झाडे हातून सुटलेल्या क्षणात हरवत चालली होती. आणि या साऱ्यात एक अनामिक नजर दूरच्या त्या वाटेवर स्थिरावली....!!

का? किती? कुठे? कसे, माहीत नाही की आणखी काय...!

परतीच्या वाटेवर चालताना मागे वळून पाहताना मन ओलेचिंब झाले.

सांज वेळच्या सावलीसारखे डोन्ट से गुड बाय बोलता बोलता भविष्याच्या चाहुलीत बुडाले..!! मानवी मनच ते तेंव्हा, त्यादिवशी आपण...,

अन् नजरेसमोर आला तो अस्ताला चाललेला रविराज निशेच्या मांडीवर विसावला होता. आकाशात घराच्या ओढीने जाणारे ते थवे भुर्रकन उडून जात होते. नदीच्या पाण्याला अन् दूर... डोंगरातल्या झाडांना आलेली शितलाई म्हणजे जणू अपूर्व संगममच होता ...!!





**सौ.वैशाली चंद्रकांत महाडिक.**
**श्री क्षेत्र निनाम-सातारा**
**सं. क्र.-९७६७४३७९२३**

...गिरीराज्याच्या कडेला आलेली लाली संधी कालात बुडू पाहत होती. थोड्याच वेळात निशा आपले पंख पसरवून धरती वर काळी शाल पांघरणार होती. पण एवढ्यात ते दिवस नजरेसमोर आले. वरच्या घराच्या माडीच्या भिंतीवर भिंतीत असलेले ते पोपटाची चिमण्यांची ती घरटी त्यातून लोंबकळनारी ती गवताची काडी अन् त्या घरट्यात विसावणारे ते ऊन अन् कधीतरी मध्ये मध्ये हलणारी ती गवताची काडी हललेली जाणवली की वाटायचे आतमध्ये त्याचे पिल्लू असेल. काही दिवसांनंतर ते पिल्लू उडायला लागले की मन आनंदून जायचं. अन् मग ओठांवर यायचे जणू अशी पाखरे येती. अन् भुर्रकन उडूनिया जाती. तेव्हाच्या त्या गाण्याचा अर्थ आज किती सखोल पणे पुढे येतो.

दिवस आपल्याला मागे टाकून कसे निघून जातात ना हो! मनाची ती चलबिचल अन् असे किती क्षण मागे वळून पाहताना निघून गेलेले ते दिवस कसे निघून गेले ते कधी कळलेच नाही. ते म्हणतात ना वेळ कधी कोणासाठी थांबते का तिचे ती अविरत टिक टिक पुढे चालायला शिकवते. पण तेंव्हा त्या वेळेचे गांभीर्य कधी कळतच नाही.

शैशत्वाचे नेनतपण जपता जपता कळलेच नाही केव्हा पन्नाशीच्या उंबरठ्यावर विसावले. जबाबदारीच्या जाणिवेने प्रौढत्व विविध रंग ल्याले.

का सोडून द्यायचे क्षण सारे भारावलेले.

क्षण पळे पळणारच, निसर्गनियम आहे.

विचारी मना ग्लास अर्धा भरल्यापेक्षा अर्धा ग्लास रिकामा तू पाहे. भरलेला ग्लास पाहताना आपले त्या रिकाम्या ग्लासाकडे आपले दुर्लक्ष होते. यातून फक्त एकच की बोलायचे की कोणत्याही गोष्टीकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोण सकारात्मक हवा.

आज कित्येक दिवसांनी जणू मोकळा श्वास घेताना तो आनंद ते स्नेहबंध आत्मियता, प्रेम, माया, खर या अर्थाने त्याची जाणीव झाली.

माहित नसते कोण कोणासाठी चुकून पडतात ऋणानुबंधाच्या गाठी. जीवनाच्या वाटेवर चालत असताना कित्येक वाटा मागे टाकत आपण पुढच्या वाटेवर मार्गस्थ झालेले असतो. त्या अनवट वाटा तुडवत विचारांचा तोच तोच सारखेपणा एक ठराविक विचार सरणी साचेबद्धपणा या साऱ्यातून जेंव्हा आपण स्वतःला बाहेर काढतो. तेंव्हा बाहेर पडल्यानंतर माणसे माणसाला ओळखू शकतात. असे मला वाटते.

प्रेमळ मनाने केलेली विचारपूस पाठीवर फिरलेला तो हात, ते हळवे बंध अन् त्या हळव्या बंधातून नात्याची झालेली एक गुंतवणूक कितीतरी शक्ती देऊन जाते. अनबंध असतात नाही असे नाही. पण म्हणून माणूस म्हणून बघतानाचा तो दृष्टीकोण अश्या स्नेहबंधात नाही बदलला तर नवल ते काय!

खरंच माणसाच्या आयुष्याचे विविध पैलू असतात. जे जसे समोर असते. ते तसे नसते. हे आपले आपण समजून घ्यायला हवे. माणूस म्हणून नाही तर व्यक्तिमत्त्व म्हणून प्रत्येकाच्या आत एक चांगलं व्यक्तिमत्त्व असतेच असते. माणूस म्हणून त्याच्याकडे बघण्याचा पैलू बदलला तर तेंव्हा खरया अर्थाने त्याचा आनंद आपण घेऊ शकतो.

आनंद अगदी निखळ आनंद, धकाधकीच्या जीवनात माणूस निखळ आनंद हरवत चालला आहे. असे नेहमी वाटत राहते. जबाबदारीची जाणीव रूटीन धावाधाव जीवनाचा संघर्ष अन् बरच काही यातून बाहेर पडल्यानंतर याचा अर्थ अगदी स्वैराचार असा नाही. पण छोट्या छोट्या गोष्टीतून ही निखळ आनंद मिळत असतो. ताण तणाव असतात आणि असणारच. पण या सर्वातून थोडा वेळ काढून पुढच्या कर्तव्यासाठी एका नव्या ऊर्जेने प्रत्येकाने उभे राहिले पाहिजे. अन् हिच ऊर्जा नव्याने जगण्याचे बळ देते असे मला वाटते.

आज कित्येक दिवसांनंतर अशीच एक भारावलेल्या सायंकाळची आठवण झाली. तेंव्हाची ती वेळ ही अशीच कडूसं पडतानाची होती. निमित्त काही असो! पण अशा ही काही वेळा असतात त्या अगदी मनावर कोरल्या जातात. आणि आठवणीच्या रूपाने पुन्हा नव्याने ऊर्जा देऊन जातात. म्हणजे माझ्यासाठी तरी नजरेसमोर आली ती रम्य सायंकाळ तो थंड गार वारा मंद वाऱ्याची झुळूक ते नदीच्या पाण्यातील काठावर उडणारे ते तुषार, भल्या मोठ्या सागरकिनारी विसवणारा तो एक थेंब खळखळून किती काही सांगून जातो. त्यासोबतच सायंकाळी लुकलुकणारे ते रंगबिरंगी दिवे अन् गवताच्या पात्यापात्यात सामावलेला तो प्रकाश अन् मनमोकळ्या गप्पा मन एका सकारात्मक विचारांनी प्रेरित होते .मन प्रफुल्लित झाल्याशिवाय राहणार नाही. भारावलेली ती एक रम्य सायंकाळ सकाळच्या प्रकाश वाटा शोधीत काळाच्या वेळेत लुप्त होत जातच असते. दुःखाची अनेक कारणे असतात.पण आपण आनंदाची कारणे शोधायची असतात. असे मला वाटते.

सुटलेल्या ते क्षण अन् त्यातून मिळालेला तो आनंद नवी ऊर्जा प्रेरणा देऊन गेला.

ती रम्य सायंकाळ.. प्रकाशाच्या नव्या वाटा शोधीत सकारात्मक तेच्या मार्गावर मार्गस्थ झाली.

त्या प्रत्येक क्षणाचा आनंद ओंजळीत समावताना घरंगळून पडणारी फुले हाताला आणि मनाला एक मंद दरवळ देऊन गेली. त्या कडूसं पडतानाच्या एका रम्य सांचीपाराला (सांज प्रहर)...

# वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख - ११८



*आपण जे 'वास्तुशास्त्र पेंटींग' 'निर्माण करतो, ते केवळ उपलब्ध आणि मिळविलेल्या तपशीलावरच आधारित असते. ते पेंटींग निर्माण करतांना आपण कुठल्याही प्रकारची 'तडजोड' स्विकारत नाही,*

*आपल्यापैकी आणि ही लघुलेख माला वाचन करणाऱ्या बव्हंशी वाचकांना "पंचांग" हे आडव्या आकाराचे पुस्तक माहिती असेलच.*


*३६५ दिवसांचे ग्रह, नक्षत्र, वार, तिथी, तारे, चरण, सण, धार्मिक योग करण चरण... बापरे...!! संपूर्ण तपशीलवार नैसर्गिक-भौगोलिक-ब्रह्मांडीय आकाशाची स्थिती सांगितलेली असते. त्या 'पंचांगाचा आधार आपण 'वास्तुशास्त्र पेंटींग' निर्माणास घेतो.*

*पंचांगाची कालगणना आपण अंदाज घेण्याचा नुसता प्रयत्न जरी केला तरी मती कुंटीत होते. श्री सूर्य सिद्धान्त मताने श्री महाविष्णूच्या नाभिकमला पासून ब्रहमदेवाची निर्मिती झाली. त्या ब्रह्मदेवाचे आयुष्य शंभर वर्षाचे आहे. ब्रह्मदेवाच्या एका दिवसात १४ मनू तयार होतात. त्या एकेका मनूत महायुगे होतात. एका महायुगात ४३ लक्ष २० हजार एवढीवर्षे आहेत. यावरून ब्रह्मदेवाचे आयुष्य ३१,१०,४०,००,००,००,००० वर्षे एवढे ठरते. या एवढ्या काळाला 'महाकल्प' असे नांव ऋषी-मुनींनी दिलेले आहे.*

*ज्योतिष आणि खगोलतज्ज्ञ, गुरु भास्कराचार्य म्हणतात, 'सध्याच्या पंचांगात ब्रह्मदेवाच्या ५१ व्या वर्षातील पहिल्या महिन्याच्या पहिल्या पक्षाच्या पहिल्या दिवसाच्या १३ घटका ४२ पळे व तीन अक्षरे होऊन गेली आहेत'. त्यापुढील काळाप्रमाणे हे पंचांग सुरु असून त्यात नमूद केल्याप्रमाणे तिथी, वार, नक्षत्र, योग, करण, चंद्र - सूर्याचं उद्यास्त, भरती ओहोटीच्या वेळा इ. सर्व एकदम अचूकपणे येत आहेत. मग ही, माहिती जी अगोदरच लिहून ठेवलेली आहे ती चूक आहे असे म्हणण्याला वाव नाही. म्हणून नक्षत्रादी सर्व माहिती ही अतिप्रचीन आहे आणि ती सर्व सत्य आहे, या माहितीच्या आधारावरच "वास्तुशास्त्र पेंटींग" जे आपण निर्माण करतो, त्याचा परिणाम म्हणूनच गेल्या २० वर्षात उपयोग कर्त्याला अद्भूत रित्या मिळालेला आहे.*

क्रमश :

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238




## जात्यावरच्या ओव्या......

आखाजी सणाला
झोका खेळू ग साजरे
उडू दे वार्यावर
जाईफुलाचे गजरे ||३९९||

आखाजी सणाला
घेउद्या उंच झोका
चार दिसाच माहेर
मला नाही म्हणू नका||४००||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758


## रंगोली सजाओ रे...




ज्योतिर्मय साहित्य


लहानपणी मी दिवाळीच्या सुटीत कल्याणला जात असे. तेथे हिराबागेत माझी आत्या राहायची. तसे माझे लहानपण एका अगदी छोट्याशा खेडेगावात गेल्याने कल्याणाला गेलो की तेथील शहरी संस्कृतीशी माझा परिचय व्हायचा. हिराबाग ही एक जुनी चाळ. बहुतेक सगळे रहिवासी भाडेकरू. पुढे काहींनी ही घरे विकत घेतली. पण त्या काळात सगळे रहिवासी म्हणजे सख्खे शेजारी. एकमेकांशी जीव मिळालेला. सुखादुखाला धावून जाणारे. सण, उत्सव एकत्र साजरे करणारे असे होते.

दिवाळीच्या काळात तर या चाळीत मोठीच धामधूम आणि उत्साह असायचा. त्याकाळात घरापुढील अंगणे मोकळी होती. आता त्या अंगणाचा संकोच झाला आहे. अंगणातील जागा मोटारी, बाईक इ. नी व्यापली आहे. चाळीच्या मध्यभागी मोकळे मैदान होते, त्या ठिकाणी आता अनेक मजली इमारती उभ्या राहिल्या आहेत. चाळीची एकूण रयाच गेली आहे. काळानुसार हे बदल होत गेले ते स्वीकारण्याशिवाय आपल्याला पर्याय नाही.



पण त्या काळातील म्हणजे साधारणपणे साठ सत्तरच्या दशकातील आठवणी आजही माझ्या मनात रुंजी घालतात. डोळ्यांसमोर भूतकाळ उभा करतात. दिवाळी यायच्या आधीपासूनच दारासमोरील अंगणे सारवून, झाडून स्वच्छ केली जायची. अंगणातल्या पाव भागात फरशी बसवलेली असायची तर उर्वरित भाग मातीचा असायचा. या अंगणामध्ये रांगोळी काढली जायची. घराला लागून असलेल्या फरशीवर किल्ले बनवले जायचे. बच्चेकंपनीची लगबग असायची. तरुणांची साथ असायची आणि मोठ्यांची देखरेख असायची.

संध्याकाळ झाली की अंगणामध्ये रांगोळी काढण्याची लगबग सुरु व्हायची. रांगोळीसाठी लागणारे रंग आधीच खरेदी करून ठेवलेले असायचे. साधारणपणे माझा समज असा होता की रांगोळी काढणे हे मुलींचे आणि स्त्रियांचेच काम आहे. म्हणजे या समजाला आमच्या खेडेगावातील पारंपारिक वातावरणातील संस्कारही कारणीभूत होते. पण कल्याणला गेल्यावर या समजाला धक्का बसला. तेथे मुलींसोबतच मुलेसुद्धा रांगोळी काढीत असत. किंबहुना बऱ्याच वेळा मुलींपेक्षा मुलांची संख्या जास्त असायची. मुले अत्यंत सुबक आणि सुंदर रांगोळी काढत. ते सुरुवातीला मी नुसते बघत असे. नंतर मग काही काळाने मीही त्यांच्यात सामील होऊ लागलो. जेव्हा रांगोळी पूर्ण होत असे तेव्हा त्यातील आकर्षक रंगसंगती मनाला प्रसन्न करीत असे. रांगोळी पूर्ण झाली की मग प्रत्येकाच्या दारापुढील रांगोळी आम्ही बघायला जात असू. आणि मग आपण काढलेल्या रांगोळीपेक्षा कितीतरी सुंदर आणि वेगळी रांगोळी बघायला मिळायची. कधी कधी पुस्तकात पाहून रांगोळी काढली जायची तर कधी मनातील कल्पना आणि पुस्तकातील चित्र यांचा सुंदर मिलाफ बघायला मिळायचा. एखादा तरुण किंवा तरुणी आपल्या प्रतिभेच्या जोरावर सर्वस्वी वेगळी अशी रांगोळी काढायची. **(क्रमशः)**



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## अनिर्वाच्यनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

शब्द हे स्थुल आहेत तर अर्थ सुक्ष्म असतो. आपल्याला शब्दाचा अर्थ हवा असेल तर शब्दाचा वापर करतो.

आता हेच पहानां अतिशय विचाराने भरलेले शब्द जरी बोलले तरी ते दिसतात, म्हणून ते मायेच्याच क्षेत्रातील असतात. ते असार आणि नाशवंत असतात. शब्दाच्या माध्यमातून अर्थ कळतो. शब्दाचा अर्थ सत्य व शाश्वत असतो. आपल्याला शब्दामुळेच ज्ञान मिळते. परंतु समर्थ काय सांगतात ते लक्ष देऊन ऐका बरं का!

शब्दाचा जो अर्थ असतो तो सत्य शाश्वत असतो. परंतु स्वतः शब्द मात्र असत्य व अशाश्वत असतो. ते कसे?

वस्तूंचे दर्शन झाल्यावर शब्द आपोआप नाश पावतो. शब्द असार कवच असून त्याचा अर्थ आतील भरीव सार असतो.

पुढे समर्थ अगदी आपल्याला तत्वज्ञान सांगतात.

शेंगवर्गीय भाजीचे ऊदा. देतात, धान्य घ्यावे व भुसा किंवा फोलपट टाकून देतो त्याप्रमाणे शब्द व भूंस व अर्थ व अर्थ धान्य समजावे. पोकळ कवचात भरीव धान्य समजावे.

पोकळ कवचामध्ये भरीव धान्य सापडते. त्याप्रमाणे धान्य निवडून परब्रम्ह रूपी अर्थ समजल्यावर फोलपट रूपी शब्द आपोआपच गळून पडतात. म्हणून आत्मसाक्षात्काराशी शब्द जाऊ शकत नाहीत. समर्थानी आपले भाषेचे तत्वज्ञान यात सांगितले आहे.

आपली मराठी भाषा किती ज्ञानी आहे त्यासाठी ५ तत्वज्ञाच्या भाषा विषयक गोष्टी सांगितल्या आहेत.

१) भाषेचे प्रधान कार्य
२) शब्द अर्थ यांचा संबंध
३) अर्थाचे स्वरूप काय.
४) अर्थ आणि सद्वस्तु यांचा संबंध काय
५) जे अनिर्वाच्य आहे ते भाषेत किती व कसे आणता येते.

भाषेला दोन अंगे असतात शब्दोच्चार हे भाषेचे बाह्यांग आणि शब्दांश हे भाषेचे अंतरंग आहे. तर शब्दसमुह हा वाच्यांश आहे. त्याची थोडक्यात फोड मी पुढील प्रमाणे करत आहे. आपल्याशी कोणी बोलत आहे तेव्हा त्याचें शब्द ध्वनी रूपात आपल्या कानी पडत आहेत. हा झाला भाषेचा वाच्यांश. आता शब्द कानावर पडत असले तरी त्याचा मनाला काही तरी बोध होतो त्या बोधाला अर्थ म्हणतात. याला भाषेचा लक्षांश म्हणतात. शब्दांचा संबंध शरीराशी तर अर्थाचा संबंध मनाशी अधिक असतो. संवादामध्ये शब्द गौण तर अर्थ प्रधान असतो.


म्हणजे समर्थ भाषेचे तत्वज्ञान सांगतात की ''वाच्यांश टाकावा लक्षांश समजून घ्यावा आणि त्याचें स्वानुभावात रूपांतर करावे.

आपल्या सारख्या सर्व  मानव जातीचे व्यवहार हे देहबुद्धी तुन होतात. देहबुध्दीतील द्रष्टा,द्रुष्य,आणि दर्शन ही तीन स्थित्यंतरे निरनिराळ्या स्वरूपात आपल्याला पहायला मिळतात. द्र्युष्य संपूर्ण खरे वाटते त्यास वेगळेपणाने पहाणारा द्रष्टा''मी''आपण वरवर पहातो तेव्हा खरा वाटतो.द्रष्टेपणाला द्रुष्याचा अनुभव येतो.

या अनुभवात द्वैत असते. आणि हे अनुभव सांगण्यासाठी भाषेचा वापर होतो. अनुभव सांगितले जाताना भावना प्रगट होतात. म्हणून द्रुष्य व विश्व हे मानवी भाषेचे क्षेत्र आहे.

**(क्रमशः)**

## जेथे भगवंताचें नामस्मरण तेथे सर्व संतांचें ठाण



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

जोंवर धरिली जगाची आस । तोंवर परमात्मा दूर खास ।। परमात्म्याची प्राप्ति । न होई राखता विषयासक्ति ।। जग विषयाकार राहिले । तेथे प्रेम केले तरी घातासी आले ।। विषयी एकजीव झालो जाण । सुटता न सुटे आपण जाण ।। मान, अपमान, जगाचे सुख-दु:ख । हे स्वार्थाचेच मूळ आहे जाण ।। अभिमानात परमात्म्याचे विस्मरण। हें जीवपणाचें मुख्य लक्षण।। सुख-दु:ख, विपत्ति - आपत्ति,। ही माया प्रपंचाची ओहोटी भरती।। आत्मनिश्चय बाणल्यावांचून। माया न हटे न सुटे जाण।। आता करी शूर मन। मायेसी हटवावे आपण।। जैसें जैसें बाहेर दिसलें। त्याचें बीज आपणाशीच उरलें।। एकच वस्तूची ओळखण जाण । पूर्ण होते समाधान।। ज्याच्यांत मानावें मी सुख। त्याच्यातच उद्भवतें दु:ख।। नराचा होय नारायण। जर न चुकला मार्ग जाण।। जेथे ठेवावी आस। त्याचे बनावें लागतें दास।। देह तो पंचभूतांचा। त्याचा भरवसा न मानावा फारसा।। मी तुम्हांस सांगतों हित। दृश्यांत न ठेवावें चित्त।। दृश्य वस्तु नाशिवंत असते। भगवत्कृपेने समाधान येतें।।

परिस्थिति नसे बंधनास कारण। असे आपलेच मनाची ठेवण ।। देवास पाहावें ज्या रीतीनें। तसाच तो आपणास दिसतो जाण।। विषयाचा नाही झाला जोंवर त्याग। तोंवर रामसेवा नाही घडत सांग।। आपलें आत्यंतिक हित। हेंच खरा स्वार्थ जाण।। चित्तीं जे विषयापासून सुटले। ते आनंदासी आले।। रामनाम प्रेमयुक्त चाले धणी। त्यासी म्हणती ब्रह्मज्ञानी ।। द्रव्यदारावर्जित जाण। ही खरी संताची खूण।। सृष्टि पाहावी भगवदाकारी । प्रेम ठेवील त्याचेवरी। त्याला नाही दुसरी सरी ।। आल्यागेल्यास द्यावे अन्नदान। मुखानें भगवंताचें नाम। हृदयांत रामाची प्रीति। यासच थोर म्हणती जीवन्मुक्ति ।। न धरावी जगाची आस। तोच होऊ पाहे रामदास।। नामांत संत । नामीं भगवंत ।। वृत्ति राखावी अत्यंत शांत । हेंच संताचें मुख्य लक्षण जाण ।। जेथे भगवंताचें नामस्मरण । तेथे सर्व संतांचें ठाण।। अगरबत्ती जळून गेली। परि सुवासाने राहिली। तैसे रामचरणी झाले जे लीन । तेच खरे जिवंत जाण ।। संतचरणीं झाला लीन । त्याला भाग्यास नाही दुजें उणें। संताची संगति । भगवन्नामानें साधते ।। देहासकट माझा प्रपंच । रामा केला तुला अर्पण ।। ऐसें वाटत जावें चित्तीं । कृपा करील रघुपति ।।

## ॥ अनुभूती ॥

रामकृष्ण औसेकर
सिंहगड रोड, पुणे. मो. 98228 15640

### एक चैतन्य सूर्याचा अस्त जाहला



ज्योतिर्मय साहित्य

पुढे १९८२ चे सुमारास माझी बदली अंबाजोगाई शाखेला झाली. मला थोडे वाईट वाटले की सत्संगाला आपण वंचित झालो पण म्हणतात ना ''जेथे जातो तेथे तु माझा सांगाती'' श्री महाराजांची बदली पण त्याच वेळी अंबाजोगाई तहसिलला झाली. तेथे पण गुरूवारचा वेगळा ग्रुप तयार झाला तेथील कृष्ण मंदिरात भान राहत नसे इतके दोन दोन वाजे पर्यंत भजन चालायची अडीच वर्ष हा सत्संग तेथे लाभला याच काळात श्री महाराजांची अनेक ठिकाणी किर्तने होत असत किर्तनाचा वेगळा असा एक त्यांचा वेगळा हेतु होता. बऱ्याच संतावर त्याची किर्तन झाली. तसेच त्याची किर्तने आकाशवाणीवर खुप गाजली लोकांनी आपल्या प्रतिक्रीया भरपुर प्रमाणात आकाशवाणीला पाठवल्या त्याच्या किर्तनाची हातोटी वेगळीच होती. सुरूवात जस जस रामकृष्ण हरी करुन पर्वरंग, किर्तनाचा आशय, दिलेल्या वेळेत करणे म्हणजे अगदी तारेवरची कसरतच म्हणावी लागेल. श्री महराजांची उत्तम गायकी होती, पुर्वरंग हा किर्तनाचा आत्माच म्हणावा लागेल दिलेल्या वेळेत करणे अवघड कला आहे. महाराज गौळणी पण चांगल्या म्हणायचे त्याची खास गौळणी म्हणजे असे थांब की रे कान्हा । थांब की रे कृष्णा येते माघारी। जावु जरा थांब। खास अस वैशिष्ट्य म्हणण्यामध्ये येत असते, खुप रंगवीत असत.

एकदा असा प्रसंग घडला की आकाशवाणी वरील किर्तन ऐकून एका भक्ताने श्री महाराजांच्या किर्तनाचा कार्यक्रम पुर्णा येथे आयोजीत केला, पुर्णेला मी पण महाराजांच्या सोबत पुर्णे ला रेल्वेने स्थानकावर उतरलो ठरल्या प्रमाणे तेथील मंडळाच्या माणूस तेथे आम्हाला घ्यायला आला त्याच्या बरोबर नियोजीत किर्तनाच्या स्थानी आम्ही निघालो तेव्हा रस्त्यात त्या माणसाने मला विचारले महाराज दिसत नाहीत ! आम्ही दोघे शर्ट पँटीत त्याची काय चुक; महाराज म्हटल की वेगळा पेहराव आला तो नव्हता तेव्हा त्याला म्हटले रे माझ्या बरोबर जे आहेत तेच महाराज आहेत, ते किर्तन करणार आहेत. तेव्हा बाकी सर्व औपचारीकता झाल्यावर किर्तनाला रात्री साडे नऊ वाजता सुरूवात झाली. जस जस रामकृष्णाच्या गजरात हजारोच्या संख्येने लोक किर्तनात तल्लीन झाले होते अडीच तीन तास किर्तन रंगले गावकरी मंडळीही खुष झाले दुसरे दिवशी सकाळी बीडला परत ऑफीस एके आफीस सुरू. अशी नेहमीची धावपळ महाराजांची होत असे त्याच्या सहज बोलण्यातुन समोरच्या व्यक्तीला उपदेश घडत असे अध्यात्म या पेक्षा काही वेगळे नाही महाराजांनी अशा प्रकारे चर्चेतुन अनेकांचे संसारीक प्रश्न सोडवले.

**(क्रमशः)**



## आरोग्य संजीवनी

# हे' आहेत तीळाचे फायदे, थंडीमध्ये खाल्ल्यास फायदेशीर

ज्योतिर्मय साहित्य

जानेवारी महिना आला की सगळेच तिळगूळ आणि गुळाच्या पोळीसाठी संक्रांतीची वाट पाहतात. भारतीय संस्कृतीमध्ये प्रत्येक सणाला आणि त्यातील आहाराला शास्त्रीय महत्त्व आहे. थंडीमध्ये येणाऱ्या संक्रांतीमध्ये तीळ आणि गूळ खाण्याचेही विशेष महत्त्व आहे हे आपल्यातील अनेकांना माहित असेल. थंड वातावरणापासून शरीराचे रक्षण व्हावे यासाठी तीळ-गूळ खाल्ले जातात.

अर्धा चमचा तीळ खाऊन त्यावर कोमट पाणी प्यायल्यास थंडीचा त्रास कमी होऊन शरीरातील उष्णता टिकून राहण्यास मदत होते.

त्याचप्रमाणे त्वचा मुलायम राहण्यासाठीही तीळ उपयुक्त असतात. तीळात तेल असल्याने त्वचेची कांती सुधारते. त्यामुळे त्वचा कोरडी पडू नये यासाठी थंडीच्या सुरुवातीपासूनच तीळ खाल्ल्यास त्वचा कोरडी पडण्याचे प्रमाण कमी होते.

ज्यांची त्वचा एरवीही कोरडी पडते त्यांनी एरवीही थोडे तीळ खाल्ल्यास त्याचा चांगला उपयोग होतो.

तीळ पचायला जड असल्याने थंडीमध्ये भूक शमवण्यासाठी भाकरीला तीळ लावून खाण्याची पद्धत आहे.

याबरोबरच आपण भाजीला दाण्याचा कूट घालतो त्याऐवजी थंडीमध्ये तीळाच्या कूटाचा वापर केल्यास तोही फायदेशीर ठरतो. यामुळे भाजीला एक वेगळी चव येते.



संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

थंडीच्या दिवसात लसूण, खोबरे घालून केलेली तिळाची चटणी खाणे चांगले. ज्या महिलांना पाळीत कमी रक्तस्त्राव होतो त्यांनी ही चटणी खाल्ल्यास फायदा होतो.

ज्यांना लघवी स्वच्छ होत नाही त्यांनीही तीळ, दूध आणि खडीसाखर खाल्ल्यास मूत्राशय मोकळे होण्यास मदत होते.

दातांच्या बळकटीसाठी आणि स्वच्छतेसाठीही तिळाचा चांगला उपयोग होतो. याशिवाय केसांची वाढ चांगला व्हावी यासाठी तिळाचे तेल केसांना लावणे चांगले असते.



## लघु बोधकथा

*नावडता विषय गणित*

*श्यामलला गणित हा विषय बिलकुल आवडत नव्हता. तिला भुगोलात गोडी होती. त्यानंतर मायबापाला काळजीचा प्रश्न पडला. श्यामल गणिताचा अभ्यास करीत नाही. तिला गणित कस येणार. एकदा श्यामल अंगणात बसली होती. आकाशातील चांदण्या मोजत होती. तशी ती मोजता मोजता अडकली. तिला पुढे मोजता येईना. तेव्हा आई म्हणाली, "तुला जर गणित येत नसेल तर भुगोलही येणार नाही. तसेच इतर विषयही येणार नाहीत." श्यामल काय समजायचं ते समजली व त्या दिवसापासून ती गणिताचा जोरात अभ्यास करु लागली होती.*

*बोध-*
*सर्वच विषयाची जीवनात गरज पडत असते. तेव्हा ते शिकणे महत्वाचे.*

# ''भारतीय ज्ञानाचे वैभव'' व्याख्यान - प्रेरणादायी अनुभव

**ज्योतिर्मय साहित्य**

दि. ११ डिसेंबर २०२५ रोजी बृहन्महाराष्ट्र कॉमर्स महाविद्यालय (....), पुणे आणि हेरिटेज कलेक्टिव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ''भारतीय ज्ञानाचे वैभव'' या विषयावरील माझे व्याख्यान अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या संपूर्ण उपक्रमाचा अनुभव इतका समृद्ध, ऊर्जादायी आणि समाधानाने भरलेला होता की, त्याची विस्तृत नोंद करणे आवश्यक वाटते.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन : कार्यक्रमाच्या संयोजिका डॉ. अनघा काळे यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. त्यांच्या नियोजनामुळे कार्यक्रमात प्रत्येक टप्प्यावर एक छान प्रवाह जाणवत होता. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना जाणवत होते की त्यांनी या व्याख्यानासाठी किती आत्मीयतेने तयारी केली आहे. स्वागत, समन्वय, वेळेचे नियोजन, आणि विषयातील आवड यामुळे संपूर्ण कार्यक्रमाला एक वेगळी उंची लाभली.

विद्यार्थ्यांना भारतीय ज्ञानप्रणालीची ओळख करून देण्याची त्यांची उत्सुकता पाहून मला खूपच आनंद झाला. अशा प्रकारे मनापासून कार्यक्रमाची जबाबदारी पार पाडणारे संयोजक आजच्या काळात दुर्मिळ भासतात.

मान्यवरांची उपस्थिती : महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. लांजेकर सभागृहात उपस्थित होते. एका शिक्षकाची किंवा प्रशासकीय अधिकाऱ्याची उपस्थिती विद्यार्थ्यांना किती उर्जा देते, हे मी अनेकदा पाहिले आहे, आजही तेच अनुभवायला मिळाले.

तसेच डॉ. वाळिंबे आदी प्राध्यापकवर्गही उपस्थित होते. त्यांचे सकारात्मक संकेत आणि विद्यार्थ्यांना दिलेले प्रोत्साहन पाहून मला विशेष समाधान मिळाले. माझ्या व्याख्यानानंतर त्यांनी व्यक्त केलेले अभिप्राय प्रेरणादायी होते.

कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची जिज्ञासा- कार्यक्रमाचे हृदय

या व्याख्यानाचा सर्वात संस्मरणीय भाग म्हणजे कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचा उत्साह. साधारणपणे असे विषय पदवी विद्यार्थ्यांसमवेत चर्चिले जातात. या तरुण विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत भारतीय ज्ञानपरंपरेबद्दलचा कुतूहल आणि आदर पाहून मी भारावलो.

भारतीय गणिताची प्राचीन परंपरा,



विद्यावाचस्पती
चन्द्रहास दुर्गादासशास्त्री सोनपेठकर

वेदउपनिषदांमधील तत्त्वज्ञान, आयुर्वेदाची वैश्विकता, योगाचे मूलभूत स्वरूप, आणि भारतीय अर्थविज्ञानपद्धती या विषयांवर ऐकताना विद्यार्थी तल्लीन होते. दोन तास वातावरण सकारात्मक उर्जेने भारावलेले होते.

सखोल संवाद आणि हृदयस्पर्शी प्रतिसाद

व्याख्यानादरम्यान ''भारतीय ज्ञानाचे वैभव'' या विषयाची मी मांडणी केली. भारतीय ज्ञानपद्धतीचे मूळ वैशिष्ट्य समग्रता, सातत्य, आध्यात्मिकता आणि प्रयोगशीलता, यांची मी उदाहरणांद्वारे चर्चा केली.

वेद-उपनिषद, शास्त्रपरंपरा, गणित, खगोलशास्त्र, नाट्यशास्त्र, आयुर्वेद, योग आणि अर्थशास्त्र यांतील तत्त्वे विद्यार्थ्यांसाठी अत्यंत आकर्षक ठरली.

तसेच वेदमूर्ती देवव्रत रेखे यांच्या कार्याचा परिचय देताना विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतून जाणारा आश्चर्याचा व कौतुकाचा भाव मी जाणवला. त्यांचे योगदान भारतीय ज्ञान परंपरेचे आधुनिक सेतू म्हणून मी मांडले- आणि विद्यार्थ्यांनी ते मनापासून आत्मसात केले.

व्याख्यानाचे वातावरण इतके संवादात्मक आणि उत्साही होते की, मला स्वतःलाच जाणवत होते की हा केवळ एक कार्यक्रम नसून ज्ञानाचा उत्सव आहे.

माझ्या मनातील भावना

या संपूर्ण अनुभवातून मला जाणवले की आजची युवा पिढी अत्यंत जागरूक, कुतूहलपूर्ण आणि ज्ञानाच्या शोधात आहे. योग्य दिशादर्शन मिळाले तर ते भारतीय ज्ञानपरंपरेची जागतिक पातळीवर मांडणी अधिक सक्षमपणे करू शकतात.

मी मनःपूर्वक समाधान व्यक्त करतो की हा कार्यक्रम केवळ यशस्वीच नव्हे तर अत्यंत अर्थपूर्ण ठरला.

आयोजक, प्राध्यापकवर्ग आणि विशेषतः विद्यार्थ्यांनी हा दिवस माझ्यासाठी अविस्मरणीय बनवला.

व्याख्यान इत्यादी कार्यक्रम तसे नेहमीचे. पण हा अनुभव विशेष होता. म्हणून हा विशेष लेख. या अनुभवातून मला नवे बळ, नवी प्रेरणा आणि नवी दिशा मिळाली आहे.

***

# संगीत नाटकाला उर्जा देणारे विद्याधर गोरवले

**ज्योतिर्मय साहित्य**
**(मागील अंकावरून)**

गडकरींच्या साहित्यावर त्यांच्या स्मृती शताब्दी वर्षानिमित्ताने घेतलेल्या या साहित्यमहोत्सवात बरेच विचारमंथन झाले. राम गणेश गडकरी यांची थोरवी केवळ महाराष्ट्रापुरती नाही. त्यांच्या शब्दांनी अखिल भारतीय पातळीवर असंख्य जाणत्यांवर आपला प्रभाव पाडला आहे. मराठी साहित्यप्रेमींसाठी ही अतिशय अभिमानाची बाब आहे.

रामगणेश गडकरी साहित्य महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यात प्रा. मिलींद जोशी म्हणाले... गडकरी हे प्रतिभेचे उत्तुंग शिखर आहे. गडकरी यांची बुध्दिमता आणि मार्मिकता पाहून त्यांचे गुरु श्रीपाद कृष्ण कोल्हटकर प्रभावित झाले होते.' गडकरी यांच्याकडे विलक्षण बुध्दीमत्ता होती. गडकरींच्या भाषावैभवाचा तरुणांनी अभ्यास केला पाहिजे. गडकरींच्या साहित्याचे चिंतनही झाले पाहिजे. ज्येष्ठ विचारवंत विनय हर्डीकर म्हणाले... गडक-यांना जाऊन शंभर



वर्ष झाली. त्यांच्यावर खूप बोललं गेलं, लिहिल गेलं. सांस्कृतिक-साहित्यिक क्षेत्रात अनाधिकृत बांधकाम पाडायची असतात. रस्त्यावरची अतिक्रमणं हटवायची असतात आणि मूळ मालकाचा सन्मान ठेवायचा असतो. राम गणेश गडकरी हा मराठी नाटकाचा मूळ मालक आहे. मराठी नाटकामध्ये



शिरीष चिटणीस
सातारा मो. 75888 65051

त्यांच्या पुढे कुणी गेलेलं नाही. कादंबरीमध्ये हरीभाऊ आपटे, कवितेमध्ये केशवसुत, नाटकामध्ये राम गणेश गडकरी आणि वेगळ्या प्रकारच्या कवितेमध्ये बालकवी यांच्यापलीकडे मराठी साहित्यामध्ये कुणी गेलेलं नाही. आणि हे गडक-यांनी कसं साधलं? गडक-यांनी फक्त साडेपाच नाटकं लिहिली. राजसंन्यास नाटक अर्ध आहे. वेड्यांचा बाजार या नाटकाचे प्रयोग झाले नाहीत. पण ते नाटक वाचण्यासारखं आहे. मराठीतला पहिला फार्स वेड्याचा बाजार आहे. भावबंधन या नाटकाचा शेवटचा प्रवेश लिहून पूर्ण केला आणि अर्ध्या तासाने गडक-यांचं निधन झाले. एकच प्याला हे नाटक १९१७ साली गंधर्व कंपनीला त्यांनी लिहून दिलं पण त्याचे फार प्रयोग त्यांनी पाहिले असतील असं वाटत नाही. जागतिक वाङःमयामध्ये फ्रास काफ्का या ऑस्ट्रियन-जर्मन लेखकाचं असं उदाहरण आहे की, याचं लिखाण कमी आहे पण दोन महायुध्दांमधल्या किंवा हिंसक विसाव्या शतकाला सामोरं जाणा-या व्यक्तीचा कोंडमारा काफ्काच्या लिखाणात पहिल्यांदा आला. त्यामुळे सगळ्या मॉडर्न लिटरेचरवर काफ्काची दाट सावली पडलेली आहे. मराठी नाटकाच्या बाबतीत अशी सावली फक्त गडक-यांची आहे. दुस-या कोणाचीही नाही. राम गणेश गडकरी समजून घेण्यासाठी आधी शेक्सपिअर समजून घ्यावा लागतो. गडकरी हा समजावून सांगण्याचा विषय नाही, तर अनुभवण्याचा विषय आहे. गडकरी हे स्वयंभू होते. त्यांच्या नंतरच्या नाटककारांनी गडकरींच्या नाटकांतील सर्व आयाम घेतले मात्र त्यांच्यासारखा नाटककार झाला नाही. त्यांच्याकडे अफाट कल्पनाशक्ती, सात्विक विनोद, व्यक्तिचित्रण, निसर्गाचा अभ्यास होता. त्यांनी नाटके, अभंग, कविता, विनोद लेख लिहिले. गडकरींच्या नाटकात नऊ रसांचा समावेश आहे. गडकरींच्या नाटकातील विनोदामागे कारुण्य दडलेले असायचे. त्यामुळे गडकरींसारखा नाटककार होणे नाही.

मराठी भाषेच्या समृद्धीसाठी साहित्यिकांवर चर्चासत्रे, व्याख्याने, परिसंवाद घेणे हे महत्वाचे असून नवीन तरूण पिढीपुढे पुन्हा पुन्हा राम गणेश गडकरी यांच्यासारख्या साहित्य कलाकृतींचा जागर आपण करीत राहिल्यास ही पिढी वाचन संस्कृतीकडे आकृष्ठ होऊन मराठी भाषेचे जे संचित आहे त्याचे वाचन करून स्वतः समृद्ध होतील हे निश्चित.

***

# आज फिर जीने की तमन्ना है

**ज्योतिर्मय साहित्य**

शांभवीच्या आई वडीलांनीही एकुलत्या एक मुलींसाठी फारच हौस केली. ती दूर जाताना मात्र त्यांचे मन हेलावून गेले. सुजय समजूतदार होता त्याला त्यांची परिस्थिती समजत होती. शांभवी पण आई वडीलांना सोडून जायचं म्हणून उदास होती. सुजयने सर्वांना सांभाळून घेतले. गृहप्रवेशासाठी सुजयच्या घरच्यांनी जय्यत तयारी केली होती.. शांभवी घरदार तेथील नवीन पाहुणे, मोठमोठे लोक त्यांची उठबस हे पाहून जरा शांत झाली होती. पण ह्या सगळ्या गोष्टींची तिला सवय व्हायला हवी होती. सुजय तिला सगळ्या गोष्टी सांगत असायचा तो एकमेव आधार वाटायचा तिला.. पण तो दिवस भर कामात व्यस्त आणि तिला घरी एकट वाटायचं, घरातील सगळे आपापल्या कामात असतं फक्त जेवण तेवढं एकत्र व्हायचं, सासूबाई, सासरे सारखे राजकीय कामानिमित्त दौऱ्यावर, दिर जाऊ त्यांना स्थानिक पातळीवर काम पाहत होते त्यामुळे ते व्यस्त, तीने पुन्हा नोकरी करावी तर घरातले म्हणतील काय गरज आहे, म्हणून तिने हा विषय टाळलाच.. मग ती घरी सुजयच्या आजी जवळ जायची दिवसभर त्यांना काय हवं नको ते पहायची. दिवस भरभर जात होते कधी आई वडीलांना भेटायची कधी मैत्रिणींना, सुजय ही मोकळ्या वेळेत तिला फिरायला न्यायचा, सारे काही तिच्या मनासारखे होते तरीही तिला थोडंफार एकटं वाटायचं, कायम ती कामात गुंतली असायची लग्नाअगोदर पण आता तसे नव्हते.

आता निवडणुका जवळ आल्या होत्या म्हणून घरात सारख्या बैठका आणि कार्यकर्त्यांचे येणं जाणं असायचं घरात



सारखी वर्दळ असायची. ह्या धावपळीत सासऱ्यांची तब्येत अचानक बिघडली आणि त्यांचा रक्तदाब वाढला आणि त्यामुळे त्यांना संपूर्ण विश्रांती सांगितली होती. आता पक्षाची जबाबदारी सांभाळावी म्हणून सुजयला त्यांनी पुढे केले सुजय मात्र विवंचनेत होता, त्याच्या दादाला पुर्ण अनुभव असताना आपण ही जबाबदारी कशी स्वीकारावी? पण वडिलांच्या आजारपणामुळे आणि त्यांच्या हट्टापायी त्याला ऐकण भाग पडलं तो आपल्या खोलीत येऊन शांभवीशी बोलत असताना अचानक तिथे त्याची वहिनी आली तिला हा सगळा प्रकार समजला होता पण प्रत्यक्षात घरातले कोणी उघडपणे व्यक्त होत नव्हते. आपल्या नवऱ्यास डावलेले पाहून तिच्या तळपायाची आग मस्तकात गेली. तीने



सौ.प्रतिभा महादेव चौगले
कोल्हापूर मो. 95525 61612

सासऱ्यांना जाब विचारावा असा विचार केला तोच सुजय म्हणाला,''वहिनी'' अंग,''थांब इतक्या घाईत हा विषय काढू नकोस बाबांची तब्येत बरी नाही शिवाय आई हताश होऊन बसली आहे. आपण मिळून एकत्र काम करू, हळूहळू मी समजवतो बाबांना तू दादाला समजून सांग घरातलं वातावरण बिघडू शकतं.'' ह्यावर वहिनी शांत झाली आणि थोड्याच वेळात निघून गेली. सुजयचा दादा पहिल्या पासून अति लाडात वाढला शिक्षणाचा फारसा विचार त्याने केला नाही. वडिलांच्या राजकारणातील पदांची लालसा त्याला आधीपासून होतीच. चार गुंड प्रवृत्तीच्या लोकांना घेऊन काही तरी अरेरावी करण्यात दिवस काढले. घरातल्या लोकांचा समाजात मान राखला नाही म्हणून अनेकदा घरात बोलणी खात असे पण आता वहिनीच्या सांगण्यावरून शांत असल्याचे भासवत होता निमूटपणे काम करत आहे असं भासवत होता. या अविश्वासापायी त्याच्या हातात काम सोपवण सगळ्यांना अवघड वाटत होतं.

**(क्रमशः)**




# श्रीशैलमल्लिकार्जुन

**ज्योतिर्मय साहित्य**



श्रीशैलम हे आंध्र प्रदेशाच्या कर्णुल जिल्ह्यात आहे. कृष्णा नदी इथून जवळूनच वाहते. मंदिर भव्य असून येथील नक्षीकाम सुरेख आहे. श्रीशैलम हे नल्लामल्लाच्या जंगलात पहाडावर स्थापित मंदिर आहे. हे मंदिर काही हेक्टर क्षेत्रांत व्यापले आहे. यात चार भव्य गोपुरम आहेत. मुख्य प्रवेश मंडपातील सजावटीचे स्तंभ, नट राजाची मूर्ती, व इतर सर्वच मुर्त्या अतिशय प्रेक्षणीय आहेत.

मंदिर वैशिष्टे

बारा ज्योतिर्लिंगा पैकी एक असे हे शिवलिंग आहे. त्यास मल्लिकार्जुन असे म्हणतात. तसेच शिव मंदिराच्या मागील बाजूस ब्रह्म-रंभिका नावाने माता पार्वती विराजमान आहे. श्रीशैलमला दक्षिण कैलास असेही म्हणतात तसेच हे महत्त्वपूर्ण शक्ती पीठही आहे.

दक्षाच्या यज्ञात प्राण त्याग केल्यावर शोक दग्ध झालेल्या शिवाने, सती चा देह घेऊन आकाशात उड्डाण केले. कदाचित शिवांच्या हातून ब्रम्हांडाचे नुकसान होईल म्हणून विष्णू ने सुदर्शन चक्राने सतीच्या पार्थिव देहाचे ५२ तुकडे केले. हे तुकडे भारत, श्रीलंका, पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश इत्यादी सर्वत्र विखुरले गेले. सतीच्या मुखाचा वरील ओठ श्रीशैलम येथे पडला. आणि तिथे शक्तिपीठ निर्माण झाले.

यामुळेच ज्योतिर्लिंग व शक्तिपीठ असे दुहेरी महत्व या स्थानाला आहे.


इतिहास : येथील मंदिराचा विकास सातवाहनांच्या काळापासूनच सुरू झाला तर विजयनगरच्या राजांनी याचा आणखी विस्तार केला व याच्या सौंदर्यात भर टाकली छत्रपती शिवाजी महाराजांनीही येथे एक धर्मशाळा बांधून भक्तांच्या निवासाची योग्य सोय केली.


आख्यायिका :

१) ब्रह्मदेव हे विश्व निर्मिती करीत होते. त्यांनी अनेक लोक, पर्वत, नद्या, वन, तीर्थे, देव, दानव, सिद्ध, ऋषी यांची निर्मिती केली, पण त्यांना असे वाटायला लागले की, संपूर्ण सृष्टी साठी सर्वात पवित्र, प्राण वंत, आणि शक्तिशाली अशी भूमि कुठली असेल? त्यांनी या प्रश्नाचे उत्तर जाणून घेण्यासाठी कैलासावर जाऊन भगवान शंभूंना हाच प्रश्न केला.

**(क्रमशः)**






# स्वतःपासून लपताना...

**ज्योतिर्मय साहित्य**

वळीवाचे दिवस होते. जोराचा वारा सुरू झाल्याने वीज गेली आणि दोन्ही मुलं आणि माझी मैफिल जमली. कथाकथन हा आमचा तिघांचाही आवडीचा विषय. रंगवून रंगवून कथा सांगण्यात वैष्णवीचा हात कुणी धरणारच नाही. डोळे मोठे करून, हातवारे करत गोष्ट सांगणं हा तिचा छंद आणि अशी गोष्ट तिच्याकडून ऐकणं हा आमचा छंद.

त्यादिवशीची गोष्ट सांगायला तिनं सुरूवात केली. गोष्ट होती दोन जीवलग मित्रांची. अजय आणि राघवची. अजय नुकताच परदेशी जाऊन आला होता. त्याच्याकडे परदेशातून आणलेली रंगीबेरंगी वेष्टणातली आकर्षक चॉकलेटस होती. ती चॉकलेट्स बघून बालसुलभ वयानुसार राघवच्या तोंडाला पाणी सुटलं, त्याला अजयनं एक चॉकलेट दिलं पण राघवला मात्र ती सगळीच्या सगळी चॉकलेट्स हवी होती. राघवनं तसं बोलून दाखवलं. अजयलाही थोडा गर्व झाला आणि अजय म्हणाला, ''राघव तुझ्याकडे खूप साऱ्या रंगीबेरंगी गोट्या आहेत त्या सगळ्या गोट्या जर तू मला देणार असशील तर ही सगळी चॉकलेट्स तुझी.'' ठीक आहे म्हणत दोघांचं ठरलं. संध्याकाळ झाली की मैदानावर येताना राघव सगळ्या गोट्या आणि अजय सगळी चॉकलेटस घेऊन येणार होता. ठरल्याप्रमाणे दोघंही भेटले. वस्तूंची आदानप्रदान झाली. थोडावेळ खेळून दोघं आपापला खिसा घट्ट पकडून ठेवत घरी गेले. राघव खूप खूश होता. त्याचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. त्याला हवी ती सगळी चॉकलेटस त्याला मिळाली होती. आता तो रोज एक याप्रमाणे बरेच दिवस ती चॉकलेटस खाणार होता. त्यादिवशी त्याला शांत झोप लागली. पण इकडे अजय मात्र अस्वस्थ झाला होता. त्याच्या मनात शंका निर्माण झाली होती. राघवनं सगळ्या गोट्या आपल्याला दिल्या असतील का? त्याला झोप लागेना. त्याची घालमेल त्याच्या आईनं ओळखली आणि काय झालं असं विचारलं. अजय म्हणाला, 'आई, त्यानं ठरल्याप्रमाणे सगळ्या गोट्या मला नसतील दिल्या.' आईनं आपल्या मुलाच्या मनातला गोंधळ ओळखला आणि त्याला विचारलं 'अजय, तू सगळी चॉकलेटस त्याला दिलीत ना?' तसा अजय चपापला. म्हणाला, 'नाही आई मी ठरल्याप्रमाणे वागलो नाही. मी काही चॉकलेटस माझ्या कडेच ठेवलीयेत'

आई म्हणाली, 'बाळा, तू तुझ्या मित्राला फसवलंस म्हणून त्याच्याबद्दल तुझ्या मनात शंका निर्माण झाली म्हणजे चूक तुझीचै.'

आईच्या गळ्यात पडत अजय म्हणाला, आई, मी वाईट आहे का गं? मी माझ्या आवडत्या मित्राला फसवलं'

आई म्हणाली, बिलकुल नाही.



तुझ्या मनात काही काळासाठी चोर आला होता. तू वाईट असतास तर तुला आनंद झाला असता आणि पटकन झोपही लागली असती. पण तू मनानं खूप चांगला आहेस म्हणून तुझ्यातला चांगला मुलगा तुझ्यातल्या चोरामुळे अस्वस्थ झाला.'

'मग आता मी काय करू आई?' अजयनं विचारलं.

आई म्हणाली, 'मनातल्या मनात राघवची माफी माग आणि सकाळी उठून त्याची सगळी चॉकलेटस त्याला परत करुन ये.'

सकाळ झाली. अजय बेचैन झाला होता. पटपट आवरून खिशात सगळी चॉकलेटस कोंबून तो मित्राकडे निघाला. पाहतो तर काय! राघव खूप आनंदात गोट्यांसोबत खेळत होता. अजयला पुन्हा एकदा वाईट वाटलं की आपण इतक्या चांगल्या मित्राला फसवलं. तो राघवच्या जवळ गेला. राघवला घट्ट मिठी मारून म्हणाला, 'सॉरी राघव मी तुला फसवलं. मी माझ्याकडच्या सगळे चॉकलेटस तुला दिले नाहीत' असं म्हणून अजयने खिशातल्या सगळी चॉकलेटस राघवला देऊन टाकली. तेव्हा राघव म्हणाला, 'अरे अजय तू जर मला सांगितलं नसतं की तू सगळी चॉकलेटस मला दिली नाहीत तर मला ते कळलंच नसतं. मग तू इतका अस्वस्थ का झालास?' अजयच्या डोळ्यात पाणी होतं. राघवची आई दुरून हे सगळं बघत होती. ती पुढे आली आणि म्हणाली 'अजय अस्वस्थ झाला कारण इतरांना फसवणं सोपं असतं पण स्वतःला फसवणं अवघड असतं आणि तेच अजयच्या बाबतीत झालं त्याने तुला फसवलं पण तो स्वतःला फसवू शकला नाही म्हणून तो अस्वस्थ झाला'. असं म्हणून राघवच्या आईने अजयचं खूप कौतुक केलं सगळी किल्मिषं दूर झाली दोन मित्र पुन्हा एक झाले.



सविता कारंजकर
(मो)९९२२८१४१८३

गोष्ट संपली, वीजही आली. आम्ही तिघं पांगलो पण कृष्णा अस्वस्थ असल्याचं मला जाणवलं. तो आलाच जवळ 'आई, मीही तुला फसवलंय एकदा. एकदा नाही दोनदा..नाही नाही खूपदा.'

म्हटलं ,' अरे, तू अजून लहान आहेस. आईबाबा किंवा कुणाशीच खोटं बोलायचं नसतं'

'तरीही आई मी तुला सांगतो मी तुला काय फसवलं ते' कृष्णाची पूर्ण शरणागती!

आई, एकदा तू शेजारच्या काकूंना आपल्या बागेतले पेरू नेऊन द्यायला सांगितलं होतं पण ते पेरू मी स्वतःच खाल्ले, एकदा तू दूध आणायला पाठवलंस तेव्हा उरलेल्या पैशातून खाऊ घेतला आणि तुला सांगितलंच नाही 'मी त्याला जवळ घेतलं तो हळूहळू शांत झाला.

आपल्याला दोन मनं असतात. एक मन तात्काळ आनंद देतं पण तो आनंद अल्पकालीन असतो आणि दुसरं मन दीर्घकालीन आनंद देणारं असतं. गोष्टीतल्या अजयला क्षणिक सुख मिळालं होतं ते त्याच्या शरीराला पण मन मात्र अस्वस्थतेच्या चक्रात अडकले होतं. आपण इतरांना सहजच फसवू शकतो पण आपल्या अंतर्मनाला खोटं पटवून देता येत नाही. खोटेपणानं मिळालेला आनंद मनालाच सहन होत नाही. आपण कोणती कृती केली, का केली आणि ती किती चुकीची आहे हे मनाला आधीच माहीत असतं. पळवाटा शरीर शोधतं, पण मनाकडे त्या चुका लपवण्याची जागा नसते.

चांगुलपणा आणि चुकीची कृती एकत्र राहत नाहीत.

अजय वाईट मुलगा नव्हता म्हणूनच चुकीचा निर्णय त्याला बोचला.

अस्वस्थता ही 'अंतर्मनातला गजर' असते. चुकीचं काही केल्यावर आपल्यालाच आतून बेचैनी, अपराधीपणा किंवा भीती का वाटते?

कारण अंतर्मन म्हणत असतं, ''थांब हे योग्य नाही.''

आपली सावली कायम आपल्या मागे येतेच. चुकीचा निर्णयही तसाच परत परत आपल्याला आठवण करून देत असतो.त्यादिवशी कृष्णाला मी फक्त एकच गोष्ट सांगितली ''बाळा, चूक होतेच; पण ती मान्य करण्याचं धैर्य दाखवणं खरी माणुसकी असते.''

अजय आणि राघवच्या गोष्टीतली खरी जादू चॉकलेट्स किंवा गोट्यांत नव्हती;

ती होती मनातल्या प्रामाणिकपणात. आपण इतरांपासून काही लपवू शकतो, कधीकधी फसवूही शकतो. पण आपल्या मनाला मात्र आपण फसवू शकत नाही. चुकीच्या गोष्टींचं ओझं मनाला जड वाटतं. कृष्णाने गोष्ट शांतपणे ऐकली,

आणि मांडीवर डोकं ठेवत म्हणाला, ''आई, माझ्याही मनात कधी चोर आला तर मीही अजय सारखंच वागेन, कारण मला स्वतःला फसवायचं नाही.'' तेव्हा समजलं, 'प्रामाणिकपणा हा शिकवण्याचा विषय नसतो, तो मनात हळूवार रुजणारा संस्कार असतो.'

# एक आगळ वेगळ पुस्तक - ''रानभुलीचे प्रदेश''

**ज्योतिर्मय साहित्य**

''रानभुलीचे प्रदेश'' हे सौ विजयालक्ष्मी मणेरीकर यांचे एक आगळे वेगळे पुस्तक. त्यांना संगीताचा वारसा (पं.शंकरराव वैरागकर.) वडिलांकडून लाभला आणि पुढचे मार्गदर्शन पंडित हृदयनाथ मंगेशकर यांच्याकडून घेतल आणि घेत आहेत. त्या दरम्यान त्यांनी पंडित हृदयनाथ मंगेशकर यांनी संगीतबद्ध केलेल्या काही रचनांचा आपल्याला परिचय करून दिला आहे. परंतु तो परिचय असा आहे की कवितेच गाणं होताना असा आहे... म्हणजेच त्या कविता स्वरबद्ध आणि संगीतबद्ध करताना तिची वाटचाल प्रवास कसा होता हे सर्व त्यांनी पं हृदयनाथ मंगेशकर यांच्याशी झालेल्या संवादातून उलगडून आपल्यासमोर सादर केले आहे.

या कवितांमध्ये शांताबाई शेळके आरतीप्रभू,मंगेश पाडगावकर, सुधीर मोघे, सुरेश भट,भा.रा तांबे, यांच्या कवितांचा समावेश आहे.

हे पुस्तक चार विभागात विभागले आहे. सुरुवातीला हृदयनाथ मंगेशकरांनी संगीतबद्ध केलेल्या कवितां-

गाण्यांवरील ललित लेख दुसऱ्या भागात विजयालक्ष्मींनी पंडित हृदयनाथ मंगेशकरांवर लिहिलेल्या काही कविता तिसऱ्या विभागात त्यांच्यावरच लिहिलेले काही प्रासंगिक लेख आणि चौथ्या भागात त्यांच्याच मराठी. हिंदी गाण्याची सूची आपल्याला बघायला मिळेल.

सुरांची वीण जेव्हा घट्ट बांधली जाते तेव्हा शब्द पहिले की सूर पहिले हे शोधणे कठीण होतं. अस ज्याच वर्णन केलय एक चिरंतन चालणार गाणं म्हणजे दयाघना. दयाघना का तुटले रे चिमणे घरटे.... या गीताची जन्म कथा सांगितली आहे

पहा टाकले पुसुनी डोळे गिळला मी हुंदका.. रणांगणे जा सुखी राजसा परतुनी पाहू नका.. हे शांताबाई शेळके यांचे गीत याचा परिचय आपल्याला करून दिलेला आहे.

मास्टर दिनानाथ मंगेशकर यांनी गायलेले सुहास्य तुझे मनास मोही...तर आशा भोसलेंनी गायीलेले शांता शेळके यांचे जिवलगा राहिले रे दूर घर माझे ... लता मंगेशकर आणि शांताबाई यांचं गणराज रंगी नाचतो...

तिन्ही सांजा सखे मिळाल्या.. देई वचन तुला हे भा. रा.तांबे यांचे गीत त्याच्याविषयी आपल्याला सविस्तर परिचय करून दिलेला आहे.मालवून टाक दीप चेतवून अंग अंग.. यासारखा गझल प्रकार सुरेश भटांनी मराठी मध्ये आणला त्याच्याविषयीची कथा. त्यांनी म्हटले आहे उत्कटतेची उच्च अनुभवी भटांच्या गझलांमधून मधून मिळते. चांदण्यात फिरताना माझा धरलास हात...

गेले द्यायचे राहून तुझे नक्षत्रांचे देणे.. माझ्यापाशी आता कळ्या आणि थोडी ओली पाने.. ही आरती प्रभूंची कविता,

कसे कसे हसायचे हसायचे आहे मला.. ही आरती प्रभूंची कविता. केवळ कवितेचे सुरेख चालीत गाणे झाल्यामुळे ती आपल्यापर्यंत पोहोचली.

ये रे घना.. ये रे घना.. न्हावू घाल माझ्या मना.. आरती प्रभूंची ची कविता.

अशाच अनेक कवींच्या कविता, गाण्यांना सुंदर चाली देऊन त्यांच्या आषयासह मराठी रसिकांच्या पर्यंत पोहचविल्यात.नव्हे त्यांच्या आत पर्यंत भिडल्यात.

त्या सर्व कवितांची गाणी होताना घडलेले किस्से




आणि आठवणी, चालींच्या जन्म कथा आपल्याला यातून वाचायला मिळतात आणि याचे संपूर्ण श्रेय विजयालक्ष्मी यांना आहे. कारण त्यांनी ते पंडितजींच्या संवादातून अचूक टिपले आहे.

विजयालक्ष्मी म्हणतात-
हृदयांचे जो जाणतो गूज..
त्यांच्याकडे हृदय करती अलगुज.
शब्दांचे होती स्वर अल्हादक.
भावनांच्या निश्चितीचे आश्वासक
असे हृदयनाथ सुरसाधक...

पंडित हृदयनाथ यांचे बद्दल प्राध्यापक राम शेवाळकर यांनी लिहिले आहे की ते गाणी निवडत नसत तर कविता निवडायचे. त्यांना काव्याची जाण होती आणि म्हणूनच त्यांच्या स्वरबद्ध केलेली आणि संगीत दिलेली गाण्याने मराठी रसिकाची मने जिंकलीत.

पंडित हृदयनाथ मंगेशकर आणि त्यांच्या कवितांची निवड हे एक विलक्षण समीकरण आहे त्यांनी निवडलेल्या कवितेचं गाणं होऊन ते आपल्यापर्यंत आलं आणि आपलं होऊन गेलं मराठी साहित्यातील अशा कविता या केवळ मराठी साहित्याचा अभ्यास करणारे पर्यंत आणि वाचनालयातील पुस्तकातच बंदिस्त राहिल असत. पण पंडितजींच्या गाण्याच्या माध्यमातून त्या सर्वत्र पोहोचण्यात नव्हे तर मुलुखापार आणि साता समुद्रापार संपूर्ण जगात पोहोचल्या विविध भाषेमध्ये त्याचे भाषांतर झालं आणि गायल्या गेल्या. ही सगळी गाणे गेले पन्नास पेक्षा जास्त वर्ष सातत्याने ऐकूनही ती कंटाळवाणी झाली नाहीत.हे विशेष.

दुसऱ्या विभागात हृदयनाथ मंगेशकरांवर लिहिलेल्या सहा कविता आहेत पंडितजींना विजयालक्ष्मी गुरुस्थानी मानतात. आपल्या स्वरांचे देणे या कवितेत त्या म्हणतात .

कवितेचं होतं सहजच गाणं
अनवट सुरांच्या प्रतिभेचे लेणं
अभंग, भक्ती, लोकगीत, गजल
सगळ्याच अविष्करातून प्रकटतं
हृदयानाथांचं अवखळ जगणं..
आणि
असे लाभले स्वरांचे देणे मंगेश कृपेने
गाते मी या कंठी नादब्रह्माची स्तुती सुमने..

आपल्या एका प्रासंगीक लेखात त्या म्हणतात संत ज्ञानेश्वर महाराज कृत ''पसायदान'' ही संगीत रचना म्हणजे पंडितजींनी महाराष्ट्राला दिलेला ज्ञानेश्वरीचा महाप्रसाद आहे. तर शिवकल्याण राजा हा संग्रह म्हणजे मराठी काव्य संगीत विश्वातील एक अद्भुत कलाकृती आहे.मागे एका लेखात विजयालक्ष्मीनी पंडितजींचा उल्लेख संगीत सागरातील हिमनग असाही केलेला आहे.

पुढच्या शेवटच्या भागात आपल्याला त्यांची भक्ती गीते, शिवकल्याण राजा, कोळीगीते, भावगीते, चित्रपट गीते, त्यांनी स्वतः गायलेली मराठी गाणी हिंदी गाणी संगीतबद्ध केलेले हिंदी चित्रपट आणि बंगाली चित्रपट यांची यादी पण आपल्याला सविस्तर मिळते.




पंडितजींबद्दल विजयालक्ष्मी यांचे मनात आदराचे स्थान आहे. त्या म्हणतात पंडितजींकडून गाणे शिकताना संगीताची परमोच्च आनंदानुभूती मिळते हेच या आयुष्याचे सार्थक आहे. आता हा जन्म अखेरचा व्हावा असं मला वाटतं हे शब्दातीत आहे ती समजण्याची व्याप्ती आपल्या बुद्धीच्या बाहेरची असली तरी तो अनुभव दिव्य आहे. या पुस्तकातील गाणी म्हणजे महास्वरसागरातून ओंजळभर पाणी घेणे असे आहे. पंडितजींचे प्रत्येक गाणे रानभूल आहे आपण त्यात भुलून अडकून पडतो अर्थातच आपल्याला चकवा पडतो.

पुस्तकाला दिलेल्या आशीर्वाचनात पंडितजी म्हणतात लक्ष्मी, फार चांगली सुरुवात झाली आहे. तू वर वर लिहीत नाहीस तू विचारात एकाकार होतेस. अभिव्यक्ती मध्ये व्यक्तिमत्व विसर्जित होणे म्हणजे त्या कलेच्या गाभाऱ्यात प्रवेश करणे. ज्याला प्रवेश मिळतो तो मागे कशाला वळतो ? सरस्वतीच्या कुशीत ऊब खूप काय सामान्य कलाकारास मिळते?

खरोखरच विजयालक्ष्मी यांच्ये कडे कला, संस्कृती,शिक्षण,साहित्य, संगीत, सौंदर्य, सारेच आहे. आपल्या पाठराखण मध्ये अच्युत गोडबोले म्हणतात रानभुलीचे प्रदेश हे पुस्तक अतिशय सुंदर आहे अतिशय रसाळ पध्दतीने मांडणी केलेली आहे. त्यामुळे अतिशय देखणं झालेल आहे. माहितीपूर्ण असे हे पुस्तक सगळ्यांनी वाचायला पाहिजे.

अजूनही त्यांची काही पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत त्यांना खूप शुभेच्छा आणि त्यांच्या नवीन पुस्तकांच्या प्रतीक्षेत .

# नवा भारत समजून घ्यायला हवा - डॉ. उदय निरगुडकर

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे : भारत महाशक्ती म्हणून पहिल्यांदाच सिद्ध होत असल्यामुळे अनेक देश विविध प्रकारे भारताविरुद्ध षड्यंत्रे रचत आहेत. नवा भारत खूप काही नवे, सकारात्मक आणि चांगले घडवत आहे. लक्षणीय प्रगती करत आहे. हा नवा भारत भारतीयांनी समजून घ्यायला हवा, अशी अपेक्षा ज्येष्ठ पत्रकार डॉ. उदय निरगुडकर यांनी व्यक्त केली.

'कौशिक आश्रम' आणि 'अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठान' यांच्या वतीने आयोजित 'शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे स्मृती व्याख्यानमाले'त डॉ. निरगुडकर बोलत होते. 'अस्थिरता, फुटीरतावाद आणि भारत' या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले.

नव्या भारतात जे काही चांगले घडत आहे, ते लोकांसमोर येऊ नये आणि देशाचे नकारात्मक चित्र लोकांसमोर उभे रहावे, असे नियोजनबद्ध प्रयत्न सुरू आहेत. अशा खोट्या कथ्यांवर (नॅरेटिव) विश्वास न ठेवता त्यांना आपण पराभूत करू या, असे आवाहन डॉ. निरगुडकर यांनी केले.

व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प डॉ. संजय उपाध्ये यांनी गुंफले. 'वसुधैव कुटुंबकम्' हा मानवतेला शांती मिळवून देणारा सद्गुण आणि विचार भारताकडे आहे. हिंदू सनातन चिंतनातूनच जगाला शांती मिळू शकते. त्यासाठी साऱ्या भारतवासीयांना एकत्र यावे लागेल. प्रत्येकाला चांगल्या कार्यात सक्रिय व्हावे लागेल, व्यक्त व्हावे लागेल, आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगावा लागेल. राष्ट्राच्या उद्धारासाठी काम करावे लागेल, असे डॉ. उपाध्ये म्हणाले. जेष्ठ कार्यकर्ते दिवाकर पांडे यांची कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती होती. नागेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले.



## श्रेया रासनेचा विशेष सन्मान

व्याख्यानमालेत श्रेया रासने हिचा मानपत्र आणि अकरा हजार रुपये देऊन विशेष सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र राज्य संस्कृत नाट्य स्पर्धेत श्रेयाने लिहिलेल्या 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' या नाटकाला सर्वोत्कृष्ट नाटकाचे तसेच दिग्दर्शन आणि लेखन यासाठीचे प्रथम पारितोषिक मिळाले. श्रेया सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून वेदांत विषयात पदव्युत्तर शिक्षण घेत आहे. तिला नाट्यकलेची विशेष आवड आहे.

# रितेश चव्हाण ठरला स्ट्राँगेस्ट मॅन किताबाचा मानकरी



**ज्योतिर्मय साहित्य**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे सी डी जैन महाविद्यालय, श्रीरामपूर येथे ०९ व १० डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या आंतर विभागीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत सासवड येथील वाघिरे महाविद्यालयाच्या चारही खेळाडूंनी आपापल्या वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. पुरुष गटात रितेश चव्हाण याने एकूण ७०२.५ किलोग्रॅम वजन उचलून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ २०२५-२६ चा स्ट्राँगेस्ट मॅन हा किताब जिंकला.

मुलींमध्ये ८३ किलोग्रॅम वजन गटात प्रतिभा लोणे हिने स्क्वॉट २००, बेंचप्रेस ९०, डेडलिफ्ट १६५ असे एकूण ४५५ किलोग्रॅम वजन उचलले. सिद्धी काळाने हिने ५२ किलोग्रॅम वजन गटात स्क्वॉट १२७.५, बेंचप्रेस ६७.५, डेडलिफ्ट १३० असे एकूण ३२५ किलोग्रॅम वजन उचलले, तर पुरुषांच्या गटात रितेश चव्हाण याने स्क्वॉट २९०, बेंचप्रेस १५०, डेडलिफ्ट २६२.५ असे एकूण ७०२.५ किलोग्रॅम वजन उचलले. पृथ्वीराज शिंदे याने १२० किलोग्रॅम वजन गटात स्क्वॉट ३००, बेंचप्रेस १९०, डेडलिफ्ट २६५ असे एकूण ७५५ किलोग्रॅम वजन उचललून निर्विवाद सुवर्णपदक पटकावले.

खेळाडूंच्या दैदिप्यमान कामगिरीबद्दल सर्व खेळाडूंचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पंडित शेळके, उपप्राचार्य डॉ.बी.यू.माने, डॉ.संजय झगडे, रवी जाधव यांनी अभिनंदन केले. विजेत्या खेळाडूंना शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक प्रा. प्रितम ओव्हाळ यांचे मार्गदर्शन लाभले.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559